| | |
|---|---|
| | **दिघी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड**<br>**वडमुखवाडी ता हवेली जि पुणे.** |
| **प्रेसनोट** | **दिनांक ११/१०/२०२३** |

**आझादनगर पोलीस स्टेशन जिल्हा धुळे येथिल भादवि कलम ३०२ मधील फरार (रेकॉर्डवरिल) अट्टल गुन्हेगार व त्याचे दोन साथीदारांवर दिघी पोलीस स्टेशनकडील पोलीसांकडुन केलेल्या धडक कारवाई बावत...**

---

आझादनगर पोलीस स्टेशन जिल्हा- धुळे येथिल दिनांक ०८/१०/२०२३ रोजी दाखल गुन्हा रजि नं २७५/२०२३ भादवि कलम ३०२,३६४,१४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६ आर्म अॅक्ट १२०ब (४)२५ ,महाराष्ट्र अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१)(३) मधील फरार व रेकॉर्डवरिल गुन्हेगार १.महेश ऊर्फ घनश्याम पवार व त्याचे साथीदार २.गणेश माळी ३.जगदीश चौधरी असे मयत नामे शुभम साळुंखे यांचा व्यवसायामधील बाचाबाचीवरुन कोयता ,फायटर व धारदार शस्त्रांनी दिनांक ८/१०/२०२३ रोजी खुन करुन पळुन गेलेले होते , त्याबाबत आज रोजी दिघी पोलीस स्टेशन कडील पोलीस अंमलदार ३०६३ सोमनाथ खळसोडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारांमार्फत सदर आरोपी हे मॅग्झीन चौक ,दिघी येथे उभे असल्यावावत गुप्त बातमी मिळाल्याने , मा वरिष्ट पोलीस निरीक्षक श्री मच्छिंद्र पंडीत यांच्या मार्गदर्शन व आदेशान्वये पो उप नि श्री ए एन कटपाळे ,पोलीस हवालदार ९८० मुकुंद कोकणे ,महिला पोलीस नाईक १८३५ कांचन पंडीत ,मपोअंमलदार ३७०० प्रतिक्षा बच्छाव , मपोअंमलदार ३७४२ प्रियांका लाकुडझोडे व पोलीस मित्र प्रविण डोसे असे रवाना होवुन मॅग्झीन चौक ,दिघी येथे तिघे जण उभे असल्याचे दिसल्याने त्यांची छायाचित्रांवरुन खात्री करुन त्याच्या दिशेने जात असताना , पोलीसांना बघुन पळुन जाण्याच्या प्रयत्नात असताना आरोपीना शिताफिने ताब्यात घेतले . सदरवेळी क्राईम युनिट धुळे कडील स्टाफ देखिल पोहोचले त्यांचे मार्फत आरोपीबाबत खात्री करुन संयुक्तरित्या आरोपीना दिघी पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले . सदर आरोपींकडुन एक ग्लॅमर मोटार सायकल क्रमांक एम एच १८ बी डब्लु ७४८३ जत्प करुन ताब्यात घेण्यात आली .

सदरची कारवाई श्री. संदिप डोईफोडे मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ ०३, श्री. राजेंद्रसिंह गौर मा. सहायक पोलीस आयुक्त, भोसरी एमआयडीसी विभाग , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मच्छिंद्र पंडीत दिघी पोलीस ठाणे तसेच श्री दशरथ वाघमोडे पोलीस निरीक्षक (गुन्हे) दिघी पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली पो उप नि श्री ए. एन. कटपाळे ,पोलीस हवालदार ९८० मुकुंद कोकणे ,महिला पोलीस नाईक १८३५ कांचन पंडीत , पोलीस अंमलदार ३०६३ सोमनाथ खळसोडे ,मपोअंमलदार ३७०० प्रतिक्षा बच्छाव ,मपोअंमलदार ३७४२ प्रियांका लाकुडझोडे व पोलीस मित्र प्रविण डोसे यांनी आरोपी यांचे छायाचित्रातील वर्णनावरुन फरार रेकॉर्डवरील आरोपीची माहिती प्राप्त होताच मॅग्झीन चौक दिघी येथुन ताब्यात घेतले.

सदरच्या कारवाईत आरोपींकडुन एक ग्लॅमर मोटार यायकल क्रमांक एम एच १८ बी डब्लु ७४८३ जप्त करण्यात आली असुन एकुण ३ आरोपींना धुळे एलसीबी चे पोउपनि श्री अमरजीत मोरे व पथकाच्या ताब्यात देण्यात आले .सदर गुन्हयाचा तपास आझादनगर पोलीस स्टेशन जिल्हा- धुळे यांचेकडे चालु आहे.

दिनांक ११/१०/२०२३

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner